



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार १५ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# तर भाजपचा ४८ पैकी एकही खासदार निवडून येऊ देत नसतो; मनोज जरांगेचं फडणवीसांसह भाजपला आव्हान

**मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली आहे**




## एकट्या फडणवीसांकडून मराठा समाज वेठीस- जरांगे

एकट्या फडवणीसने समाजवेठीस धरला आहे. पण तुझी गाठ माझ्याशी आहे. 6 कोटी मराठा तुडवून माझ्याकडे यावे लागेल. माझ्या बद्दलचे काही व्हिडीओ तयार करायचे आणि मला बदनाम करायचे. असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. हे व्हिडीओ एडिट केलेले असतात. तुम्हाला जे करायचे ते करा, मला जे करायचे ते मी करेल. पण तुमच्या मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण मिळवेल. फडवणीस यांनी कितीही बदनाम केले समाजापासून हटत पण मी घाबरून तुमच्या बाजूने मेलो तरी येणार नाही. फडवणीस यांची काय नीच वृत्ती आहे, गरीब इमानदार पोरग लढत आहे, तुम्ही पाठ थोपटायला पाहिजे, असंही जरांगे यांनी म्हटलं आहे.

मराठा आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील पुन्हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्यावर जहरी टीका केली आहे. बीडमधील वडवणी येथील सभेमध्ये बोलताना त्यांनी भाजपला आव्हान दिलं आहे. आगामी निवडणुकीमध्ये भाजपचा 48 पैकी एकही खासदार निवडून येऊ देत नाही, असा धमकीवजा इशाराज मनोज जरांगे यांनी भाजपसह देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. काय म्हणाले जरांगे? मी वडवणी मधूनजाहीर आव्हान करतो, तुम्ही मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला तर यांचे 48 पैकी एकही खासदार निवडून येऊ देत नाही. फडवणीस तुला सांगतो तुझा खासदार आणि आमदार राज्यात निवडून येऊ देणार नाही. दुसरे कुणीही निवडून द्या पंरतु यांचा कोणीही निवडणून येऊ द्यायचा नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडवणीस यांच्यासारखा आणि खुनशी मंत्री मी पाहिला नाही. त्यांच्याकडून बोलणारे सात ते आठ आहेत. सत्ता येत असते जात असते, नका त्रास देऊ. माझी SIT चौकशी सुरू आहे. तुमच्यावर गुन्हे दाखल होत आहेत तर होऊद्या. मी सागर बंगल्यावर जाऊन दहा लाख घेऊन जातो. मराठ्यांनी व्यसनापासून लांब रहा, आपली प्रगती कोणीही रोकू शकत नाही. जामनेरचे टंबरेल गिरीश महाजन म्हणतो माझे खूप लाड केले अरे तूच आमचा चहा पेला आणि पोहे खाल्ले, असं मनोज जरांगे म्हणाले.

## लोकसभा निवडणूक

### तिकीट मिळताच पंकजा मुंडे यांचा धनजय मुडे याना सूचक इशारा



भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना पक्षाकडून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर झाली आहे. खासदार प्रीतम मुंडे यांच्या जागेवर पंकजा मुंडे यांना पक्षाकडून संधी देण्यात आली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाची युती झाल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत परळी मतदारसंघात पंकजा मुंडे आणि मंत्री धनंजय मुंडे एकमेकांसमोर कसे निवडणूक लढवतील? अशी चर्चा सुरु होती. त्यामुळे आपल्याला कदाचित लोकसभेची संधी देण्यात आल्याचं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे. पंकजा मुंडे यांनी आज खासदार प्रीतम मुंडे यांच्यासोबत एकत्र पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना एक महत्त्वाचा प्रश्न विचारण्यात आला. धनंजय मुंडे यांनी लोकसभा निवडणुकीत साथ दिली तर विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडेंना साथ द्याल का? असा प्रश्न पंकजा मुंडे यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी धनंजय मुंडे यांना सूचक इशारा दिला.

### विजय शिवतारे ६ तासांपासून शिंदेंच्या भेटीसाठी



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाचे नेते विजय शिवतारे हे आज मुंबईत आले आहेत. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी मुंबईत आले आहेत. विजय शिवतारे हे बारामती लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन्ही नेत्यांवर टोकाची टीका केली आहे. तसेच आपण बारामती लोकसभा निवडणूक लढवणारच, असा निर्धार त्यांनी केला होता. त्यांच्या या भूमिकेमुळे महायुतीत वितुष्ट तर येणार नाही ना? अशी चर्चा सुरु होती. महायुतीकडून उमेदवारी मिळाली नाही

### त्याच्या डोक्यात काही लोकांनी हवा घातलीय की



राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके आज पुण्यात दाखल झाले आहेत. ते पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार गटाच्या कार्यालायत पोहोचले आहेत. त्यांचं शरद पवार यांच्यासोबत बोलणं सुरु आहे. त्यांची बैठक सुरु आहे. या बैठकीनंतर त्यांचा शरद पवार गटात पक्षप्रवेश होण्याची दाट शक्यता आहे. निलेश लंके यांनी शरद पवार गटात प्रवेश केला तर अजित पवार गटासाठी मोठा धक्का असेल. निलेश लंके खासदारकीसाठी इच्छुक आहेत. त्यामुळे त्यांना अहमदनगर मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवायची आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते मुलींच्या वसतिगृहाचे भुमीपुजन

**दत्ता पाटील यांचा पुढाकार**

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते अंबाजोगाई येथे उभारण्यात येणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाचे भुमीपुजन करण्यात आले. सदरील वसतिगृहासाठी दत्ता (आबा) पाटील यांनी मोफत जागा उपलब्ध करून दिली आहे.



अंबाजोगाई शहरातील रिंग रोडवरील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या श्री मुकुंदराज प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या परीसरात हे मुलींचे वसतिगृह उभारण्यात येणार आहे. या वसतिगृहासाठी दत्ताआबा पाटील यांनी जमीन उपलब्ध करून दिली आहे. भुमीपुजन कार्यक्रम दि. १४ मार्च रोजी सकाळी १० वाजता विधीवत संपन्न झाला. या कार्यक्रमास अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन दत्तात्रय ज्ञानोबा पाटील, बीड जिल्हा परिषदचे माजी सभापती राजाभाऊ औताडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अमर देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी सभापती राजेसाहेब देशमुख, शिवसेनेचे मदन परदेशी, प्रख्यात -हदयरोग तज्ञ डॉ. गोपाळ पाटील, प्रा. सुलभा सोळुंके, मुकुंदराज उच्च विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब माने, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनिता धायगुडे, अमोल लोमटे, कल्याण भिसे, दुष्यंत लोमटे, यांच्या सह शाळेतील सर्व सहशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यापारी महासंघाने घेतली डीवायएसपी गोल्डे यांची भेट

**बीड : प्रतिनिधी**

बीड येथे नूतन डी.वाय.एस.पी म्हणून रुजू झालेल्या विश्वंभर गोल्डे यांचा बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय या ठिकाणी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापाऱ्यांच्या सुरक्षाविषयक चर्चाही करण्यात आली. उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वांभर गोल्डे यांच्याशी व्यापारी शिष्टमंडळाने विविध विषयावर चर्चा केली. यामध्ये बीड शहरासह जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या सुरक्षा विषयावर तसेच सी.सी.टी.व्ही लावण्याबद्दल विस्तृत चर्चा करण्यात आली. लवकरच व्यापारी वर्गासोबत बैठक घेऊन त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन गोल्डे यांनी दिले.



यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक शेटे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बन्सोडे, शहराध्यक्ष प्रकाश कानगावकर जवाहरलाल कांकरीया, राजेंद्र मुनोत, सूर्यकांत महाजन, लाईक अहमद, पारस बोरा, वाय.जनार्दन राव, सुदाम चव्हाण, सुशील खटोड, मदन दुग्गड व इतर व्यापारी उपस्थित होते.

## डॉ. ज्योत्स्ना आडे विविध पुरस्काराने सन्मानित

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई येथील कन्यारत्न डॉ. ज्योत्स्ना आडे यांना भारत भूषण पुरस्कार,राष्ट्रीय उत्कृष्ट महिला पुरस्कार व राष्ट्रीय आरोग्य सेवा उत्कृष्टता पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. दि. १० मार्च रोजी महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे डॉ. आदित्य पतकराव यूथ फाउंडेशन व मानवपरिवर्तन विकास व बहुउद्देशीय सेवा भावी संस्थे तर्फे आयोजित, राष्ट्रीय महिला संसद २०२४ भरवण्यात आली होती. देशभरातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा याव राष्ट्रीय उत्कृष्ट महिला पुरस्काराने सम्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी भारत सरकारच्या अल्पसंख्याक




आयोगाच्या सदस्या श्रीमती रिंचेन लाम्हो, भारत सरकार तर्फे मॉंटेनेग्रो देशाच्या ऑनररी काउन्सुलेट डॉ. जाणीस दरबारी, भारत सरकारच्या अनुसूचित जाती आयोगाच्या माजी सदस्या श्रीमती अनुज बाला, भारत सरकारच्या अर्जुन अवॉर्डी श्रीमती नसरीन, भारत सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाचे सल्लागार सदस्य तसेच फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ.आदित्य पतकराव, श्री रामदास आठवले युनियन मिनिस्टर ऑफ स्टेट सोशल जस्टिस अँड एम पॉवरमेंट गव्हर्मेंट ऑफ इंडिया, अभिनेत्री व मॉडल श्रीमती नुपूर मेहता व अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. ज्योत्स्ना आडे यांचे बारावी पर्यंतचे शिक्षण योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई येथे झालेले आहे. त्यांनी बीडीएस ,के बी एच डेंटल कॉलेज नाशिक येथून केलेले आहे. त्या सद्या सिंहगड डेंटल कॉलेज पुणे येथे एमडीएस शिक्षण घेत आहेत. डॉ.आदित्य पतकराव यांनी देशभरातील सर्व महिलांनी पुढे येऊन आपल्या देशासाठी असेच योगदान करावे व देशाच्या प्रगतीला हाथभार लावावा अशी आशा व्यक्त केली. राष्ट्रीय महिला संसद २०२४ च्या कार्यक्रमादरम्यान पुणे येथील अमोल टेंभरे व नामदेव तौर यांचा सामाजिक कार्यासाठी भारत भूषण पुरस्कार देवून विशेष सन्मान करण्यात आला.

## पत्रकार उत्तम हजारे यांचा रयत पुरस्काराने सन्मान

**- सिनेमा कलावंत, रिल्स स्टार यांच्या उपस्थितीत साजरा झाला रयत प्रतिष्ठानचा पुरस्कार सोहळा**

वादळवार्ता/बीड

बीडच्या रयत सामाजिक प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा बीडच्या डॉं. बाबासाहेब आंबेडकर न्याय भवनमध्ये मोठया थाटात साजरा झाला. यंदाच्या पुरस्कार सोहळयात सिनेमा क्षेत्रातील कलावंत ,रिल स्टार, इंन्सटाग्राम स्टार यांची रेलचेल या पुरस्कार सोहळयात बघायला मिळाली. मनोरंजन क्षेत्रातील कलावंता बरोबरच वकिल , डॉंक्टर, पत्रकार, नगरसेवक ,समाजसेवक, उद्योजक, संपादक, अश्या विवीध क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला आहे. दैनिक लोकाशाचे निवासी संपादक उत्तम हजारे यांना रयत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहयासाठी सिनेमा क्षेत्रातील महेंद्र खिल्लारै , महादेव ( म्यडी) सवाई ,ज्योती जावळे, प्रविण वडमारे, एजाज शेख, संतोष वारे ,विलास सोनवणे,सुरेखा डोंगरदिवे, रणजित वाघमारे, प्रमोद रामदासी , दैनिक लोकांकितचे संपादक संजय पवार सर, जेष्ठ पत्रकार उत्तम हजारे ,नगरसेवक विकास जोगदंड साहेब असे कलाकार व मान्यवर उपस्थित होते तर शोशल मिडीयावर अल्पावधीतच रिल्स , इंन्सटाग्राम म्हणुन प्रसिद्धी झोतात आलेले अनेक कलावंत या सोहयात न्हाऊन निघाले आहेत, रयतच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळयात अनेक दिग्गज मान्यवर पुरस्कार प्रदान करण्यासाठी उपस्थित होते . यामध्ये राजेश खर्डे ( नाखवा ) मुंबई , विठ्ठल मुर्केवार ( सेवा निव्रुत्त वरिष्ठ अधिकारी,रयतच्या संस्थापक अध्यक्ष रोहीणी ताई गणेश माने,कैलास दादा पठारै (जेष्ठ समाजसेवक ) , लक्ष्मण लटपटे ओ.बी.सी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य, अँड अविनाश गंडले आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडला .यावेळी रयत सामाजिक प्रतिष्ठानचे गणेश माने , जिल्हा अध्यक्ष संतोष कुराडे, गणेश तालखेडकर, प्रमोद रामदासी, रणजित वाघमारे, तुषार जाधव , मिनाक्षी देवकते व इतरांनी हा



कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

या वेळी मराठा आरक्षण मिळवून घेऊ या लढाई वेळी गुन्हे दाखल झाले असतील होतील त्या गोष्टीला भ्या यचं नाही तुम्ही एक पाऊल पुढे चालला तर मी दहा पावले पुढे टाकल मी सदैव तुमच्या सोबत राहील असे सांगून पोटभरे यांनी तरुणांचे मनोबल वाढवत जागृती निर्माण करण्याचे काम केले यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते बबनराव सोळंके नटू तात्या सोळंके शाहाजी सोळंके विश्वासराव सोळंके भास्कर बाबा सोळंके विश्वंभर सोळंके शरद शिंदे कृष्णा सोळंके लहू तात्या सोळंके सुनील निंबाळकर शुभम सोळंके योगेश सोळंके कृष्णा सोळंके ओमकार सोळंके सोमेश्वर सोळंके प्रमोद सोळंके युवराज कंकळ सिद्धेश्वर सोळंके संतोष सोळंके लक्ष्मण निंबाळकर वसंत सोळंके दामू एरंडे लखन सोळंके पप्पू सोळंके गणेश सोळंके गजानन सोळंके वेदांत सोळंके इत्यादीसह मोठ्या प्रमाणात गावकरी उपस्थित होते

## संपादकीय

# लसीकरणाची खास वैशिष्ट्ये!

जगभरात कोरोना महामारीने दहशत निर्माण केल्यानंतर लसीचे महत्व अधिक ठळकपणे दिसू लागले. पण हा लसीकरण दिवस खरंतर दि.१६ मार्च १९९५पासून सुरू झाला. कोरोना काळानंतर तर या दिवसाला अधिक महत्व दिले जाते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून या राष्ट्रीय लसीकरण दिनाचे महत्व जाणून घ्या.... संपादक.

बाळ जन्मल्याबरोबर अर्ध्या तासात केलेले स्तनपान म्हणजे बाळाचे पहिले लसीकरण होय. चीक घट्ट दुधासारखा असतो. त्याचा रंग लिंबाच्या रंगासारखा पिवळसर हिरवा असतो. दुधामध्ये पहिले तीन ते सहा दिवस हा चीक असतो. चीकातील रोगप्रतिबंधक शक्तीमुळे बाळाचे अनेक रोगांपासून संरक्षण होते. उदा.जुलाब, सर्दी, खोकला, कान फुटणे, पोलियो, दमा इत्यादी आजारांपासून बाळाचा बचाव होतो. हा चीक पोटात गेल्यामुळे बाळाला शौचास साफ होते आणि पोटातील काळी घाण शौचावाटे आपोआपच बाहेर पडते. चीक जरी घट्ट असला तरी पचायला तो हलका असतो. या चीकामुळे आतड्यात पाचकरस तयार होण्यास मदत होते. चीक व दुधातील अन्न घटक बाळाला पोषकच ठरतात. बालकांमधील लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या आजारांचे प्रमाण व त्या आजारांमुळे होणारे मृत्यु कमी करण्यासाठी नियमित लसीकरण कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. ऑक्टोबर १९७७मध्ये लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व क्षयरोग या पाच आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ''विस्तारित लस टोचणी कार्यक्रम- विलटो'' सुरु करण्यात आला. सन १९८५-८६मध्ये ''सार्वत्रिक लसीकरण'' कार्यक्रम सुरू करण्यात आला. गोवर लसीचा समावेश सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमामध्ये करण्यात आला आहे. नियमित लसीकरण कार्यक्रमाच्या वेळापत्रकामध्ये हिपॅटायटिस बी या रोगाच्या लसीचा समावेश राज्यात सन २००८-०९मध्ये टप्याटप्याने करण्यात आला. आता ही लस सर्व जिल्हयांमध्ये लागू करण्यात आली आहे. नियमित लसीकरण कार्यक्रमात जापनीज एन्सेफलायटिस या रोगाच्या लसीचा समावेश अमरावती महानगरपालिकासहीत यवतमाळ, नागपूर, भंडारा, वाशिम, गडचिरोली, लातूर आणि बीड जिल्ह्यात करण्यात आला. महाराष्ट्रात लसीकरणाच्या वेळापत्रकामध्ये सन २०११पासून गोवर लसीच्या दुसऱ्या मात्रेचा समावेश करण्यात आला.

लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येणाऱ्या आजारांसाठी लहान बालकांचे लसीकरण, धनुर्वातासाठी गरोदर मातांचे लसीकरण सुरू झाले आहे. नियोजित सत्रांमध्ये लसीकरण करणे आरंभ झाला आहे. लसीची क्षमता टिकविण्यासाठी शितसाखळीचे व्यवस्थापन केले जाते. लसीकरणाची सुरक्षितता वाढविण्यासाठी सर्व जिल्हे व महानगरपालिका यांना एडी सिरिंजेसचा पुरवठा करण्यात येतो. जैविक वैद्यकिय कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्यात येते. वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे नियमित प्रशिक्षण घेण्यात येते. लसीकरणानंतर उदभवणाऱ्या विपरित प्रतिक्रियांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर अन्वेषण समित्यांची स्थापना होते. लसीकरणानंतर उदभवणाऱ्या विपरित प्रतिक्रियांची माहिती नोंदविण्यासाठी ''व्हिजीफलो'' या आंतरराष्ट्रीय ग्लोबल पोस्ट मार्केटिंग सर्व्हेलन्स ऑनलाईन सॉफ्टवेअरचा वापर होतो. राज्यात नियमित लसीकरण कार्यक्रम केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येतो. लसी तसेच सिरिंजेस शितसाखळी उपकरणे व अनुदान केंद्रशासनाकडून पुरविण्यात येते. लसीकरणासाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे दिलेल्या लसीकरणाच्या वेळापत्रकाचा वापर केला जातो. आरोग्य संस्था व बाह्यसंपर्काच्या ठिकाणी ठराविक दिवशी लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात येते. लाभार्थीपर्यंत लस पोहचविण्यासाठी लसीची वाहतूक करताना शितसाखळीची गुणवत्ता अबाधित ठेवली जाते. आरोग्य व कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये असणाऱ्या लाभार्थींची नोंद लसीकरण रजिस्टरमध्ये करतात. लसीकरणाच्या सेवा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून लाभार्थींना विनामुल्य पुरविल्या जातात. लसींची शितसाखळी अबाधित ठेवण्यासाठी आईसलाईन्डम रेफ्रीजरेटर, डिपफ्रीजर, कोल्ड बॉक्स व्हॅक्सीन कॅरिअर, आईस पॅक, वॉक इन कुलर आणि फ्रीजर्स अशा उपकरणांचा वापर केला जातो. पल्स पोलिओ लसीकरण मोहिम ही राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम स्वरुपात संपुर्ण राज्यात व ठराविक जिल्ह्यासह सर्वच जिल्ह्यातील अतिजोखमीच्या कार्यक्षेत्रात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते. इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स- आईएपीने शिफारस केली आहे की ६ महिने ते ५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना वर्षातून एकदा फ्लूची लस दिली पाहिजे.

# आयाराम-गयाराम राजकीय पुढाऱ्यांना जागा

सध्या जशा-जशा लोकसभा निवडणुका जवळ-जवळ येत आहे व राजकारण तापत आहे तसं-तसं राज्यासह देशात राजकीय भूकंप येतांना दिसतो आणि ही आयाराम-गयाराम परिस्थिती सर्वच राजकीय पक्षांत आपल्याला पहायला मिळत आहे व हळूहळू राजकीय भुकंपाचे झटके यायला सुरुवात झाली आहे आणि हे संपूर्ण राजकीय भुकंपाचे झटके स्वतःच्या स्वार्थापोटी निर्माण झालेली परिस्थिती आहे.सध्या राज्यातच नाही तर देशात अनेक पक्षातील राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे दलबदल सुरू आहे.परंतु यासाठी ठोस कायदा नाही किंवा शिक्षा नाही मनात येईल तेव्हा सत्तेसाठी पक्ष बदलविने हा राजकीय पुढाऱ्यांचा धंदा बनल्याचे दिसून येते ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.यामुळे सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधीवरून हळूहळू विश्वास उडत असल्याचे दिसून येते.पक्ष बदलल्या नंतर कोणत्याही पक्षाने त्या राजकीय पुढाऱ्यांना आपल्या पक्षात घ्यायला नको,जर घेतले तर कोणतेही राजकीय पद किंवा लोकप्रतिनिधीत्व पद द्यायला नको.परंतु पक्ष सोडलेल्या राजकीय पुढाऱ्यांना हे सर्वच संपत्तीच्या बळावर ताबडतोब मिळते त्यामुळे असे वाटते की यांच्यासाठी काहीही कायदे कानुन किंवा नियमावली नसल्याचे दिसून येते.राज्यात किंवा देशात पक्ष बदलण्या मागचा मुख्य उद्देश म्हणजे त्यांच्या जवळ असलेली करोडो रुपयांची वाममार्गाने कमविलेली अमाप चल-अचल संपत्ती असने ती वाचवण्यासाठी सत्ताधारी पक्षात प्रवेश करणे किंवा केलेले घोटाळे बंद करण्यासाठी किंवा वाममार्गाने कमविलेल्या संपत्तीवर ईडी किंवा इतर कारवाई होवू नये या उद्देशाने राज्यात राजकीय पुढारी यापक्षातुन त्यापक्षात उंदरा सारख्या उड्या मारतांना दिसतात.तरीही स्वतःला आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी) समजतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.राज्यात किंवा देशात गेल्या ३० वर्षांत असा एकही राजकीय पुढारी दिसला नाही की त्याने जनहितासाठी पक्ष सोडला असावा.राजकीय पुढारी या पक्षातुन त्या पक्षात जातात तेव्हा त्यांना नीतिमत्ता,पक्षांचे नियम, पक्षासाठी घेतलेली शपथ, एकनिष्ठता,पक्षाबद्दल स्वाभिमान पक्षाची नियमावली,पक्षाने आपल्याला दिलेले वैभव हे संपूर्ण एका क्षणात विसरतात.स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणारा पक्ष किंवा राजकीय वर्तुळात विरोधी पक्षावर ताशेरे ओढणारे राजकीय पुढारी अचानक सर्वच गोष्टी विसरतात हे कसे काय? कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार-खासदार (लोकप्रतिनिधी) किंवा राजकीय पुढारी असो तो जेव्हा पक्ष बदलतो तेव्हा त्याला काहीच कसे काय वाटत नाही?ज्या पक्षाचे अनेक वर्षे प्रतिनिधीत्व राजकीय पुढारी करतो तेव्हा तो विरोधकांवर तुटुन पडतो.अशा वेळेस लोकांना खरे वाटते व तो राजकीय पुढारी लोकांची मने जिंकतो.परंतु हाच राजकीय पुढारी ज्यांच्या विरोधात बोलतो त्यांच्याच पक्षात प्रवेश करतो तेव्हा याला काय म्हणावे? यावरून स्पष्ट होते की आजचा राजकीय पुढारी फक्त स्वार्थासाठीच राजकारण करीत असल्याचे दिसून येते.राजकीय पुढारी जेव्हा पक्ष बदलवितात तेव्हा सर्वसामान्यांच्या जिव्हारी लागते व मन दु:खावते.कारण राजकीय पुढाऱ्यांचे किंवा लोकप्रतिनिधीचे किंवा आमदार -खासदार यांनी सत्तेसाठी पक्ष बदलविने म्हणजे ज्या ताटात खाल्ले त्याच ताटाला छिद्र पाडने होय.महाराष्ट्रातील राजकारण पहाता राजकीय पुढाऱ्यांना असे वाटते की फक्त आपणच खूप हुशार आहोत व बाकी सर्व लोक अणपड-गवार आहेत असे वाटते. कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय उलथापालथ मोठ्या प्रमाणात सुरू आहे जनुकाय राजकीय भुकंप आला की काय असे वाटते.राजकीय उलथापालथमध्ये राज्याचा करोडो रुपयांचा चुराडा होतो आहे.याचा सरळ परिणाम गरीब, सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना भोगावा लागतो आहे. करोडोचा भ्रष्टाचार राजकीय पुढारी करतील आणि त्याचे प्रयचित्य गरीब,सर्वसामान्यांनी व शेतकऱ्यांनी भोगावे हा कुठला न्याय म्हणावा?कारण गेल्या काही वर्षांपासून राजकीय दृष्ट्या सर्वसामान्यांची किंमत झीरोबजेटमध्ये असल्याचे दिसून येते. यामुळे राजकीय पुढारी तुपाशी आणि सर्वसामान्य उपाशी असल्याचे दिसून येते. राजकीय पुढारी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करतात व सत्तेसाठी हपहपल्यासारखे एकमेकांवर तुटुन पडतात. यात सर्वसामान्यांचा किंवा मतदारांचा अजीबात विचार केला जात नाही हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षांत राजकीय पुढाऱ्यांनी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.कारण आमदारांना (लोकप्रतिनिधींना) जनता पाच वर्षांसाठी निवडूण यासाठी देते की राज्याचा कारभार सुरळीत चालावा व विकास झपाट्याने व्हावा.परंतु राजकीय पुढारी राज्याचा किंवा सर्वसामान्यांचा विकास करण्यापेक्षा स्वतःच्या विकासावर जास्त भर देतांना दिसतात मग तो कोणत्याही पक्षाचा पुढारी असो.याचे जीवंत उदाहरण सर्वांसमोर आहे.राजकीय पुढारी निवडुण आल्यानंतर मतदारांना विसरतात हे जनतेला चांगलेच लक्षात आले. गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रात राजकीय पुढाऱ्यांनी तमाशा मांडुन जनतेच्या भावनांशी खेळतांना दिसतात. काही दिवसापुर्वी सत्ताधारी पक्षाने भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्या पक्षातील राजकीय पुढाऱ्यांना सत्ताधारी पक्ष आपल्या सोबत घेतो हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.मग काय भ्रष्टाचारारी राजकीय पुढारी जर सत्ते सोबत गेले म्हणजे शुद्ध होतात काय? असाही प्रश्न उपस्थित होतो. अशाप्रकारे असे अनेक प्रश्न उद्भवतात.यामुळे राजकीय दृष्ट्या राज्याची परिस्थितीत दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसते. याकरीता कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढारी आमदार (लोकप्रतिनिधी) यांच्यावर लगाम कसने अत्यंत गरजेचे आहे.कारण राज्याच्या घडामोडी या लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.राजकीय पुढारी आपल्या स्वार्थापोटी पक्षांतर करतात व सत्तेत सहभागी होतात.याचा मनस्ताप लोकांमध्ये दिसून येतो.याकरीता पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणेची गरज आहे.कारण कोणताही पक्ष असो त्याला पक्षाबद्दल निष्ठा व आपुलकी असायला हवी. परंतु सध्याच्या परिस्थितीत सर्वच राजकीय पुढारी निष्ठा,पक्षाचे आचारविचार हे सर्व बाजुला सारुन सत्तेकडे धावतांना दिसतात.यामुळे कायद्याच्या माध्यमातून राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवरने अत्यंत गरजेचे आहे.सध्या राज्यातील राजकीय घडामोडीमुळे सर्वसामान्यांनमध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जोपर्यंत राजकीय पुढाऱ्यांवर पक्षांतर बंदी कायद्यात सुधारणा होत नाही तोपर्यंत असाच राजकीय खेळ सुरू राहील.त्यामुळे राजकीय पुढारी खुर्चीसाठी सर्वसामान्यांचा बळी घ्यायला सुध्दा मागेपुढे पाहत नाहीत हे त्यांच्या पक्ष बदलण्याच्या प्रक्रियेत वरून दिसून येते.परंतु मतदार बंधु-भगिनी आयाराम-गयाराम राजकीय पुढाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखवू शकतात. राज्यातील किंवा देशातील कोणत्याही राजकीय पक्षाचा उमेदवार असो त्याने जर दलबदल केले असेल मतदारांनी कोणालाही मतदान करावे.परंतु दलबदल वाल्या उमेदवाराला अजीबात मतदान करु नये.कारण सत्तेसाठी तो पक्षाचा होवू शकत नाही तर आपला काय होईल याचाही मतदारांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# आभासी कविसंमेलनात समाजव्यवस्थेवर शब्दप्रहार

मराठी भाषेचा जागर करणा-या महाराष्ट्रातील जीवन गौरव साहित्य परिवारातर्फे आभासी कविसंमेलनाचे आयोजन दि. १० मार्च २०२४ ला करण्यात आले.

संमेलनाचे अध्यक्ष सेवानिवृत्त भारतीय सैनिक चंद्रशेखर सोनागोते नागपूर यांनी संविधानाची पुष्पपुजा करुन कविसंमेलनाची सुरुवात केली. कविसंमेलनात सहभागी कवी-कवयित्रींनी कविता सादर करताना समाजव्यवस्थेतील विषमता आणि सारे काही सत्तेसाठी यावर बहुतेकांनी आपल्या शब्दांतून प्रहार चढविला. तत्कालीन रावण आणि हल्लीचा रावण यातील भेद कवितेतून रेखाटल्या गेला. माय-बापाची वर्तमान परिस्थिती, श्वासातील कविता, निसर्गकविता, कौटुंबिक पार्श्वभुमीच्या कवितेतून माणसे जोडण्याचे आवाहन करण्यात आले.

मराठी भाषेच्या जागरात सहभागी झालेल्या कविंमध्ये रविंद्र गिमोणकर नागपूर, महेंद्र सोनेवाने गोंदिया, कल्पना देशमुख यवतमाळ, किरण देशमुख चंद्रपूर, डॉ. प्रल्हाद हरिणखेडे मुंबई, विजेता चन्नेकर गोंदिया, गोवर्धन बिसेन गोंदिया, ज्योत्स्ना बन्सोड, बालकवयित्री विधी बन्सोड गडचिरोली, साहित्य परिवाराचे अध्यक्ष भारत झाडे चंद्रपूर, समूह निर्माता गणेश कुंभारे ब्रम्हपुरी हे सहभागी झाले होते. संमेलनात सारस्वतांची गर्दी नसली तरी ती गुणात्मक उपस्थिती असल्याचे समाधान सर्वांनी मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश कुंभारे, सूत्रसंचालन साहित्य परिवाराच्या प्रशासिका मनिषा पाटील, सातारा यांनी तर आभार भाषा प्रमुख डॉ. प्रल्हाद हरिणखेडे मुंबई यांनी मानले. जीवन गौरव साहित्य परिवारातर्फे समुहावरील सारस्वतांसाठी महिण्याच्या दुस-या रविवारला कविसंमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे.

# आत्मनिर्भर ते निर्यातदार देश हे कृषी क्षेत्रातील क्रांतीमुळे शक्य-प्रा. शिवशंकर पटवारी

**वादळवार्ता/बीड**

कृषी क्षेत्राशी संबंधित शासकीय योजना, कृषी विद्यापीठा मार्फत होत असलेली संशोधने आणि कृषी विस्तार शिक्षणामुळे शेतीच्या तंत्रात मुलगामी बदल होत गेले.त्यातून देशाने आत्मनिर्भर ते कृषीमाल निर्यातदार देश अशी भारताची नवी ओळख निर्माण झाली आहे असे प्रतिपादन प्रा. शिवशंकर पटवारी यांनी केले. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम आणि कॉम्प्युटर सायन्स, बीड तसेच संभाजीराजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे कोळवाडी येथे सात दिवसीय शिबिराच्या समारोपा प्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कै.



अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थेचे सचिव तसेच संभाजीराजे लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स महाविद्यालय बीड चे प्र.प्राचार्य गणेश पोकळे हे होते. व्यासपीठावर वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिजम आणि कॉम्प्युटर सायन्स बीड प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. पटवारी म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर कृषी विकासाच्या संदर्भात अवलंबविलेल्या अनेक योजनांचा एकत्रित परिणाम म्हणजेच अन्नधान्यांच्या बाबतीत आलेला स्वावलंबीपणा, साखरेच्या उत्पादनातील अतिरिक्त उत्पादकता, आत्मनिर्भर ते निर्यातदार देश म्हणून कृषी क्षेत्राने देशाच्या सर्वांगीण विकासात योगदान दिले आहे. ग्रामीण आणि कृषी विकासासाठी कृषी विभाग,पशू वैद्यकीय विभाग, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी शिक्षण अशा अनेक विभागांच्या योजना ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या असल्याचेही त्यांनी म्हटले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.भूषण मठपती यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. सुहास गाढवे यांनी केले.शेवटी आभार प्रा. ओंकार देशमुख यांनी मानले.या कार्यक्रमाला प्रा. राजश्री महाजन,इम्रान पठाण ,महेश नेवडे,प्रवीण उंदरे ,दीपक जाधव,सचिन चौरे, संध्या खोसे, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हडपसर येथे परीट समाजाचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न



**वादळ वार्ता /पुणे हडपसर**

संत गाडगेबाबा ट्रस्ट तर्फे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त परीट समाजातील सुशिक्षित व व्यापारी यांच्यासाठी स्नेह मिलन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते हॉटेल किल्लेदार मांजरी फार्म हडपसर पुणे येथे अतिशय उत्साहामध्ये कार्यक्रम संपन्न झाला त्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित माजी आमदार योगेश अण्णा टिळेकर अँड विजय हरगुडे अध्यक्ष भाजपा कामगार आघाडी श्री प्रमोद वाकोडकर अध्यक्ष उद्योग आघाडी भाजपा यावेळी उपस्थित स्नेह मेळाव्याचे आयोजन अँड आकाश काळे यांनी केले. यावेळी माजी आमदार योगेश अण्णा टिळेकर मत व्यक्त करताना म्हणाले की राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त स्नेह मेळाव्याचे जे आयोजन केले आहे ते अतिशय उत्तम आहे परीट समाजाने आपले स्वतःचे अस्तित्व ओळखले पाहिजे व व व्यवसायामध्ये नवीन टेक्नॉलॉजी वापरून व्यवसायामध्ये प्रगती करावी. परीट समाजाचा जो आरक्षणाचा विषय आहे तो सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असे आश्वासन योगेश टिळेकर यांनी दिले. श्री प्रमोद वाकडकर अध्यक्ष उद्योग आघाडी भाजपा याप्रसंगी बोलताना म्हणाले की परीट समाजातील सर्व बांधवांनी विश्वकर्मा योजनेचा लाभ घ्यावा काही अडीअडचणी आल्यास आम्ही उद्योग आघाडीचे सर्व कार्यकर्ते आपल्यासाठी प्रयत्नशील राहो. लॉन्ड्री व्यवसाय हा परीट समाजाचा पारंपरिक व्यवसाय असो त्याला परीट बांधवांनी आधुनिक मशनरी चा वापर करून व्यवसायात उन्नती करावी. यावेळी उपस्थित भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार योगेश अण्णा टिळेकर श्री अँड विजय हरगुडे प्रदेशअध्यक्ष भाजपा कामगार आघाडी श्री प्रमोद वाकोडकर प्रदेश अध्यक्ष उद्योग श्री.भुषण तुपे (उपाध्यक्ष भाजप पुणे शहर. धोबी महासंघ, श्री.शिवराज आप्पा घुले मा . सरपंच मांजरी बुद्रुक,जयश्रीताई आदमाने ( वरीष्ठ संघटक परीट सेवा मंडळ),श्री. राजाभाऊ कदम नगरसेवक.श्री.भुषण तुपे (उपाध्यक्ष भाजप पुणे शहर) .Advocate सुहास कानगुडे (सचिव कामगार आघाडी महाराष्ट्र राज्य)महाराष्ट्र शासन पुरस्कृत डॉ.रोकडे सर , ग्रामपंचायत सदस्य, श्री. हनुमंत गायकवाड (एअर फोर्स अधिकारी) श्रीरंग मोरे पत्रकार संतोष गोतावळे व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते . अँड आकाश काळे यांनी आभार व्यक्त केले. संत गाडगेबाबा समाज मार्गदर्शन ट्रस्ट तर्फे सरकारी नोकरी विषयक जाहिराती व शैक्षणिकदृष्ट्या सर्व प्रकारचे मार्गदर्शन, शिष्यवृत्ती योजना व इतर सर्व क्षेत्रांतील रोजगार विषयक मार्गदर्शन व संधी, सरकारी योजना व मार्गदर्शन केले. आणि हाच आपल्या ट्रस्ट चा एकमेव उद्देश आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून विचारांची देवाणघेवाण करणे, व तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून देणे, त्या मुळे आपल्या नव्या पिढीला योग्य मार्गदर्शन, प्रेरणा व दिशा मिळावी. हा उद्देश यशस्वी झाला. या कार्यक्रमाचे आयोजक कमिटी संत गाडगेबाबा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष एडवोकेट आकाश ज्ञानोबा काळे. व वैभव मोरे व किरण पवार, प्रसाद साळुंखे, महादेव कोकाटे, मार्गदर्शक पुणे महानगरपालिका माजी उपमहापौर सुरेश नाना नाशिककर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ स्वाती काळे व आभार एडवोकेट आकाश काळे यांनी मानले

# शेती बापाचा धंदा आहे पापाचा नाही शेतमाल विकायला लाजु नका – प्रदीप वाघ

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर/सौरभ कामडी**

मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा जलस्रोत समिती तर्फे आयोजित शेतकरी व महिला मेळाव्याला मार्गदर्शन करताना मोखाडा पंचायत समितीचे उपसभापती प्रदीप वाघ यांनी सांगितले की नाबार्ड व बायफ संस्था च्या माध्यमातून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत झालेल्या दगडी बांध,चरी खोदकाम कामां मुळे पाणी पातळीत वाढ होईल, शेतकरी बांधवांनी योजनांचा लाभ घेऊन शेती समृद्ध करावी, तसेच शेती करायला तरुणांनी पुढे यावे,पिकवलेला माल




बाजारपेठेत विक्री करायला लाजु नये, महिला बचतगट माध्यमातून महिलांनाही आर्थिक उन्नती करावी असे प्रतिपादन प्रदीप वाघ यांनी व्यक्त केले. नाबार्ड पुरस्कृत बायफ व उधळे वाकडपाडा जलस्रोत समिती तर्क या कार्यक्रमाला प्रदीप वाघ उपसभापती, कुसुम झोले जिल्हा परिषद सदस्य , नंदकुमार वाघ उपसरपंच, श्री मिलिंद झोले, निलेश झुगरे,बायफ संस्थेचे प्रशांत बोराडे, एकनाथ कानवडे, अनिल पालवे, दिनेश महाले,भावेश राठोड नजन दिपक, बँक शाखाधिकारी कोमल निकम, कृषी सहायक मिटकरी, समिती चे सदस्य यशोदा बेंडकोळी, परशुराम गवारी, ग्रामपंचायत सदस्य गणेश खादे पस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समिती चे अध्यक्ष संजय वाघ यांनी केले.

# पिटीआरच्या मागणीसाठी तलवाड्यात युवकांचे आमरण उपोषण

## गाव बंद ठेवून महिलांचे उपोषणस्थळी ठिय्या आंदोलन

## माजी आ.अमरसिंह पंडितांच्या मध्यस्थीने उपोषण मागे

**वादळवार्ता/गेवराई**

गेवराई तालुक्यातील तलवाडा याठिकाणी गेल्या पंचवीस ते तीस वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जागेचा पिटीआर मिळावा या प्रमुख मागणीसाठी मंगळवार दि.१२ मार्च २०२४ पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकात युवकांनी आमरण उपोषण सुरू केले होते. तसेच गुरूवारी तलवाडा गावात कडकडीत बंद पाळून छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू असलेल्या उपोषणस्थळी महिलांनी दिवसभर ठिय्या आंदोलन केले. सायंकाळी सहा वाजता माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेण्यात आले असून तलवाडा ग्रामपंचायतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जागेचा पिटीआर अमरसिंह पंडित यांच्या हस्ते उपोषण धारकांना दिला आहे. माजीमंत्री बदामराव पंडित, बीड जि.प.चे माजी अध्यक्ष - विजयसिंह पंडित, महेश अण्णा दाभाडे, गटविकास अधिकारी गेवराई, पोलिस अधिकारी व कर्मचारी, सा.बां.विभागाचे अधिकारी यांनी उपोषणस्थळी भेट देऊन चर्चा केली. तीन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेल्या युवकांची प्रकृती खालावल्याने उपचारासाठी आलेले आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी - कर्मचारी यांच्याकडून उपचार घेण्यास आंदोलनकर्त्यांनी नकार दिला होता. तलवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे भव्यदिव्य असे बांधकाम करण्यात आलेले असून या चौकाची तलवाडा ग्रामपंचायतला मात्र नोंद नाही. या चौकाची नोंद करून पिटीआर मिळावा यासाठी रोषण हात्ते, अनिकेत नाटकर, शुभम जैत, दादाराव रोकडे यांच्यासह आठजण तीन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले होते. जोपर्यंत पिटीआर मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही असा पवित्रा उपोषणकर्ते युवक व गावातील महिलांनी घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू असलेल्या उपोषणस्थळी महिला तसेच सर्व जातीधर्मातील अनेक शिवप्रेमी नागरिकांनी गुरूवारी ठिय्या आंदोलन केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जागेचा पिटीआर मिळावा या मागणीसाठी सर्व व्यावसायिकांनी आपली दुकाने दिवसभर बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जागेचा पिटीआर मिळाल्यानंतर शिवप्रेमी युवकांनी फटाके व तोफा वाजवून आनंदोत्सव साजरा केला.




# जि.प.प्रा. शाळा बिटरगाव व शालेय व्यवस्थापन समिती तर्फे भव्य सत्कार समारंभ संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

बिटरगाव येथे १४/०३/२०२४ रोजी जि.प.प्रा. शाळा बिटरगाव मुख्याध्यापक व शालेय व्यवस्थापन समिती यांनी भव्य सत्कार समारंभ आयोजित केला होता. यामध्ये नूतन पोलीस पाटील मोनाली अतुल कोलते (पाटील) यांचा सत्कार छाया कैलास माळी (सरपंच प्रतिनिधी) यांनी केला. व जि प प्रा शाळेचा विद्यार्थी अभिषेक दुपारी याची अग्निविर दलामध्ये निवड झाली त्याबद्दल त्याचा सत्कार जिल्हा परिषद शाळा बिटरगाव चे मुख्याध्यापक सुभाष शिंदे यांनी केला.तर सोलापूर जिल्हा आदर्श ग्रामसेवक म्हणून पुरस्कार मिळालेले ग्रामसेवक शिवाजी गवळी यांचा सत्कार शाळेचे सहशिक्षक किशोर चोपडे यांनी केला.



कार्यक्रमासाठी उपस्थित शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नितीन नरुटे नवनाथ लोंढे (उपसरपंच) मा. उपसरपंच अमरजीत पाटील दिलीप व्यवहारे दिलीप बारंगुळे अजित गुंडगिरी नवनाथ नरुटे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

# फ्रेंड्स ऑफ नेचरचा १८ वा वर्धापन दिन चिरनेर येथे उत्साहात साजरा.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

फ्रेंड्स ऑफ नेचर ही उरण तालुक्यातील प्रसिद्ध अशी पर्यावरण प्रेमी, प्राणीप्रेमी संस्था आहे.१३ मार्च २००६ साली स्थापन झालेल्या या संस्थेने आतापर्यंत हजारो मुक्या पशु पक्षी प्राण्यांना जीवनदान दिले आहे. या संस्थेतर्फे अनेक उपक्रम राबविण्यात आले. उरण तालुक्यातील वन संपदा वाचविण्यात, पर्यावरणाचे रक्षण करण्यात या संस्थेचा महत्वाचा वाटा आहे. अशा या संस्थेचा १८ वा वर्धापन दिन चिरनेर मध्ये प्राणीमित्र पर्यावरण प्रेमी तथा फ्रेंड्स ऑफ नेचरचे अध्यक्ष जयवंत ठाकूर यांच्या निवास स्थानी मोठया उत्साहात संपन्न झाला. निसर्गाचे, पर्यावरणाचे संरक्षण,



संवर्धन करणाऱ्या फ्रेंड्स ऑफ नेचर या संस्थेला १३ मार्च २०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण होऊन संस्थेने १९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्या अनुषंगाने पर्यावरण प्रेमी जयवंत ठाकूर यांच्या निवास स्थानी फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन ) या संस्थेच्या नामफलकाचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी कचरा साफसफाई करणाऱ्या मजुरांना उंदीर, साप, विंचू आदी विषारी प्राण्यांचा धोका असल्याने साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पायात घालण्यासाठी सेफ्टी बूटचे वाटप करण्यात आले. अगदी साध्या पद्धतीने फ्रेंड्स ऑफ नेचर या संस्थेने आपला १८ वा वर्धापन दिन कोणताही गाजावाजा न करता शांततेत साजरा केला. यावेळी फ्रेंड्स ऑफ नेचर या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत ठाकूर,श्रद्धा जयवंत ठाकूर, उपाध्यक्ष राजेश पाटील, सचिव शेखर म्हात्रे, सदस्य - सचिन घरत,अनुज पाटील,हिम्मत केणी,निकेतन ठाकूर,चरण पाटील,प्रितम पाटील,मनोज रावल,राकेश शिंदे,निवृत्ती भोईर,विवेक हुडली,प्रथमेश मोकल,मिलिंद म्हात्रे,हृषिकेश म्हात्रे,तुषार कांबळे,राजेश अ.पाटील,स्वप्निल म्हात्रे,दिनेश चिरनेरकर,कु. प्रथमेश जयवंत ठाकूर,कु.सृष्टी जयवंत ठाकूर,विठ्ठल ममताबादे आदी संस्थेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

## धारूर शहरात विहरीत पडुन मजूर तरूणाचा मृत्यू.


वादळवार्ता/किल्लेधारूर धारुर शहरातील ऐतिहासीक किल्ल्याजवळील दुधाळा तलावाजवळील बारवा मध्ये बुडून बांधकाम मिस्त्री इशरथ बशीर आली सय्यद वय ४९ वर्ष यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला ,हा पाणी टंचाई चा पहीला बळी शहरातील ठरला आहे .मंगळवार दि १२ मार्च रोजी सकाळी हि घटना घडली.धारूर शहरातील ऐतीहासिक किल्ल्याजवळ व दुधीयापुरा भागांत असणारे तलावाजवळ जुना बारव आहे या भागातील नागरीक पाणी टंचाईमुळे सांड पाण्यासाठी येथील पाणी वापरतात या भागातील बांधकाम मजूरी करणारा इशरथ बशीर आली सय्यद हे पाणी आणण्यासाठी दि.१२ मार्च रोजी मंगळवारी सकाळी गेले असता ते परत न आल्याने पहाण्यास गेले तर त्यांचा बुडलेल्या स्थितीत मृतदेह आढळून आला. या बाबत मोमीन महमद शरीफ यांनी दिलेल्या खबरी वरुन आकस्मात मृत्यूची नोंद धारूर पोलीस स्टेशनला करण्यात आली असून पुढील तपास ए एस आय चांदणे हे करत आहेत. हा मात्र शहरातील पाणी टंचाईचा पहीला बळी असल्याची चर्चा सर्वत्र केली जात होती. प्रशासनाने आता तरी जागे व्हावे अशी मागणी होत आहे.

# मनोज जरांगे यांच्यासह १३ जणांवर अंबाजोगाई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

खोटी माहिती प्रसारित करून सरकारविरोधात प्रक्षोभक भाषण केल्याचा आरोप मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची बुधवारी (दि.१३) अंबाजोगाईत संवाद बैठक झाली. याप्रसंगी खोटी माहिती प्रसारित करून सरकार विरोधात प्रक्षोभक भाषण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघन केल्याच्या आरोपावरून मनोज जरांगे यांच्यासह आयोजकांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला अंबाजोगाईत साधना मंगल कार्यालयात बुधवारी रात्री ८ वाजता सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई शहर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मात्र, जरांगे पाटील यांना येण्यासाठी उशीर झाला आणि ही बैठक रात्री १० वाजताच्या नंतर सुरु झाली. त्यामुळे रात्री १० च्या नंतर ध्वनिक्षेपक चालू ठेऊन बैठकीसाठी दिलेल्या परवान्याचे आणि सर्वोच्च न्यालयाच्या आदेशाचे उलंघन केल्याच्या आरोप पोलिसांनी केला आहे. याप्रकरणी दाखल फिर्यादीनुसार मनोज जरांगे यांनी उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून या शिंदे साहेबांनी आपला विश्वास तोडलाय. तुमची हुशारी तुमच्यापाशी ठेवा, मी कट्टर खानदानी आहे. तुम्ही जर पालक असाल तर तुम्हाला अंतरवलीतल्या महिला दिसल्या नाही का?






त्यांच्या डोक्याच्या चिंधड्या चिंधड्या का केल्या? त्या महिला तुमच्या कोणीच नाहीत का? तुमच्या घरातील ती आई-बहिण आणि आमच्या मराठ्याच्या आई-बहिणीला इज्जत नाही का? नऊ वर्षाच्या मुलीच्या पायात गोळी घातली, त्या लेकराची गोळी काढतांना दिड लिटर पाणी तिच्या पायातून निघाले, तिच्यात तुम्हाला आई-बहिण दिसली नाही का? तुम्हाला आमच्यावर काय गुन्हे दाखल करायचे ते करा, आम्ही तुम्हाला हिसका दाखवणारच.. असे जालना अंतरवेली येथील घटनेचा संदर्भ देऊन मुलीच्या पायाला गोळी लागल्याची अशी कुठलीही घटना घडलेली नसताना खोटी माहिती प्रसारित करून सार्वजनिक भंग करण्याच्या उद्देशाने सरकारविरोधात प्रक्षोभक स्वरूपाचे भाषण केले असा आरोप पोलीस कर्मचारी संतोष यांच्या फिर्यादीत करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून मनोज जरांगे आणि बैठकीचे आयोजक सचिन सुभाषराव जोगदंड (पाटील), राजेसाहेब देशमुख, ऍड. माधव जाधव, अमर देशमुख, अजित गरड, रणजीत लोमटे, अमोल लोमटे,राहूल मोरे, ऍड. जयसिंग सोळंके, ऍड. किशोर देशमुख, भिमसेन लोमटे आणि साधना मंगल कार्यालयाचे मालक रविकिरण श्यामसुंदर मोरे यांच्यावर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भादवि ५०५ (१)(ब), १८८, सहकलम म.पो.का १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## चौसाळा येथिल हजरत सैलानी बाबा संदलच्या अध्यक्षपदी आमोल कांबळे यांची निवड

**वादळवार्ता/बीड**

बीड तालुक्यातील चौसाळा येथिल हिंदु-मुस्लीम धर्मीयांचे प्रतिक म्हणुन ओळखले जाणारया हजरत सैलानी बाबा संदल(ऊर्स) निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी शासकिय विश्रामगृह चौसाळा येथे सर्व गावकरंयाच्या वतीने बैठकीचे आयोजन केले होते या बैठकीमध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी चौसाळा ग्रामपंचायत सदस्य आमोल कांबळे यांची निवड



करण्यात आली तर उपाध्यक्षपदी दिपक मस्के सचिवपदी सुरज सोनवणे सहसचिवपदी पवन कुचेकर तर कोषाध्यक्षपदी पत्रकार सुधीर चौधरे यांची निवड करण्यात आली याबैठकीस बापु पवार, अरूण(आण्णा)सोनवणे, पंजाब वाघमारे,चौसाळा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष विवेक(बाबा) कुचेकर,राजेश सोनवणे,महादेव चौधरे, बाबासाहेब जाधव,विजय(दादा)सोनवणे, महाविर सोनवणे,संजय सोनवणे,स्वप्रील सोनवणे,विश्वास सोनणे ,बाळासाहेब वाघमारे,प्रकाश ढोकणे,प्रदीप कुचेकर,शैलेश(दादा)सोनवणे, साहील सोनवणे,प्रमोद गायके,चंदन सोनवणे,प्रशांत सोनवणे,करण कुचेकर,पंकेश सोनवणे,किशोर कुचेकर ,अमोल सोनवणे,अक्षय कुचेकर,सुरेश आंधळे,आकाश सोनवणे,रवि सोनवणे ,वैभव सोनवणे,सतिष जाधव,गणेश सोनवणे यांच्यासह गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

## केजच्या "बचपन बालविद्या मंदिर" चे स्नेहसंमेलन संपन्न



**वादळवार्ता/केज**

शहरातील धारूर रोड लगतच्या 'बचपन बालविद्या मंदिर' चे स्नेहसंमेलन शनिवारी येथील मुक्ताई फंक्शन हॉल मध्ये पार पडले. यावेळी कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, पत्रकार हनुमंत सौदागर, नगरसेविका आशाताई कराड व वर्षा राख यांची उपस्थिती होती. सीताताई बनसोड यांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक करून शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. हनुमंत भोसले यांनी पालकांनी मुलांच्या भविष्याबद्दल निर्णय घेताना योग्य विचार करण्याचा सल्ला दिला. मुलांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडू द्या असे आवाहनही त्यांनी केले. पत्रकार हनुमंत सौदागर यांनीही आमची मुले उद्याच्या समाजात आदर्श माणूस बनली पाहिजेत.त्यासाठी पालकांनी त्यांच्याबद्दलचे निर्णय घेताना घाई न करण्याचे आवाहन केले. उदघाटन कार्यक्रमानंतर लगेच या शाळेच्या चिमुकल्यानी विविध गुणदर्शना चे कार्यक्रम सादर केले. नृत्य व कला अभिनयाने या चिमुकल्यानी उपस्थितीतांची मने जिंकली. शाळेच्या संचालिका सौ वैशाली कराड मॅडम यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर श्री विनायकराव कराड यांनी प्रास्ताविक केले. कु श्रावणी कराड हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती.

## माणगाव येथील दुसऱ्या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-मुख्य संयोजक भदंत रत्न प्रिय थेरो, भदंत शांतीरत्न थेरो

**निक वादळ वार्ता**
**माणगाव/विश्वास गायकवाड**



अभिधम्मा एज्यूकेशनल अँड सोशिअल ट्रस्टव्दारे रविवार १७ मार्च २०२४ रोजी सकाळी ०८ : ०० ते सायं ०६:०० या वेळात यासीन परदेशी, शमीम मुल्ला मैदान मोरबा रोड, माणगाव, जि. रायगड येथे दुस-या आंतराष्टीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेस भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्यध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू मा. डॉ. भीमराव आंबेडकर हे प्रमुख पाहूणे आहेत. उपासक मा. .सी. आर. सांगलीकर परिषदेचे उद्घाटक आहेत. उपासक मा.डॉ. अनिलकुमार गायकवाड व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य, रस्ते विकास महामंडळ हे या परिषदेचे अध्यक्ष आहेत. मा. अंकुशजी सकपाळ, स्वागतध्यक्ष असुन नरेशजी अहिरे, सुप्रसिद्ध उद्योजक आणि धम्म दान दाते सुशांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याचे परिषदेचे मुख्य संयोजक भंदन्त, रत्नप्रिय थेरो यांनी व पुज्य भंदन्त शांतीरत्न महाथेरो आणि यांच्या उपस्थितीत आज पत्रकार परिषदेत सांगितले.

पुज्य भदंन्त डॉ. उपगुप्त महाथेरो आखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, पुज्य भदंन्त गुणरत्न महाथेरो यांचे २१ व्या शतकातील जागतिक आव्हाने आणि बुध्दाचा संदेश यावर प्रवचन देणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवमुक्तींच्या लढयाचे केंद्र बिंदू असलेल्या रायगड जिल्हयात नागोठणे, खारघर, महाड, माणगाव येथे उपासकाच्या वतीने आजपर्यंत या ठिकाणी बौध्द धम्म परिषदा संपन्न झाल्या माणगाव येथे ही भव्य दिव्य बौध्द धम्म परिषद भिक्खु संघाच्या मार्गदर्शनाखाली उपासकाच्या वतीने घेण्यात येत आहे. धम्म परिषदेमध्ये रायगड जिल्हयातील बौध्द संस्कृतीच्या खाणाखुना आणि विद्यमान बौध्दांची जबाबदारी यावर विचार मांडले जाणार आहेत. रायगड जिल्हयात धम्म, शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, समाजकार्य क्षेत्रात विशेष योगदान दिलेल्या व्यक्ती आणि संस्थाचा सन्मान बौध्दजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष आनंदराज आंबेडकर आणि जेष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या हस्ते केले जाणार आहे.

सदर धम्म परिषदेच्या अनुषंगाने नामदेव भाई कासारे, काशिनाथ मोरे सिध्दार्थ मोरे, संजय गमरे, पत्रकार विश्वास गायकवाड, यशपाल साळवी, अॅड राकेश मोरे, संतोष मोरे, राजेश हाटे, प्रवीण बागवे, राजू तांबे, उत्तम तांबे, बाजीराव गायकवाड, रोहित सकपाळ व सिम्बॉल ऑफ नॉलेज इतर असंख्य धम्म उपासक उपासिका सदर धम्म परिषदेला यशस्वी करण्या साठी विशेष प्रयत्न करत असल्याचे पत्रकार परिषदेमध्ये मुख्य संयोजक भंदन्त, रत्नप्रिय थेरो व मुंबई भिक्खू संघ अध्यक्ष भंदन्त शांतीरत्न थेरो यांनी सांगितले.

भगवान बुध्दाची प्रतिमा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सचित्र असलेली त्रिपिटक आणि बुध्द आणि त्यांचा धम्म व भारताचाचे संविधान असलेली धम्म रॅली सकाळी ०९:०० वाजता आहे. धम्म ध्वजारोहण, बुध्द वंदना भिक्खू संघास चिवर दान, मान्यवरांचे सन्मान व बुध्दधम्माच्या चळवळीला गतिमान करणारे तथा भारतीय बौध्दांच्या सक्षमीकरणाचा अजेंडा ठरावाच्या रुपाने या परिषदेमध्ये जाहीर केला जाणार आहे. सदर धम्म परिषदेस जनतेने सामाजिक गट तट विसरून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भंदन्त, रत्नप्रिय थेरो (मुख्य संयोजक) भंदन्त शांतीरत्न थेरो (मुंबई भिक्खू संघ अध्यक्ष) यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहे.

# समाजाच्या लढ्यात आपलेच लोक माझ्याशी फितूरी करत आहेत. त्यांना समाज त्यांची जागा दाखवून देईल-मनोज जरांगे पाटील

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे. सगेसोयरेची व्याख्या लागू करावी यासाठी गेल्या सात महिन्यांपासून मराठा समाजासाठी लढा देत आहे. मात्र माझ्या विरोधात आपल्याच जातीचे लोक उठले आहेत. जर तुम्ही पक्षाला एवढे मानता तर पक्ष आपल्या मागण्या का मान्य करत नाही, असा सवाल उपस्थित करून पक्षाला नाही तर जातीला बाप माना असा सल्ला मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला. अंबाजोगाईत साधना मंगल कार्यालयात बुधवारी रात्री सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र उपस्थितांची गर्दी पाहता या बैठकीचे आयोजन जाहिर सभेत झाले. या प्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आरक्षणाचा विषय एकजुटीने अंतिम टप्प्यात आला आहे. आता मराठ्यांनी माघार घेवू नये. सगेसोयरे व ओबीसीतून आरक्षण याच आपल्या प्रमुख मागण्या आहेत. मराठा समाजाच्या मुला-बाळासाठी माझा लढा सुरू असताना आपलेच लोक माझ्याशी फितूरी करत आहेत. त्यांना समाज त्यांची जागा दाखवून देईल. आपल्या भाषणात त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खरपूस समाचार घेतला. फडणवीस यांनी माझ्या विरूद्ध पोलिस कारवाई सुरू केली आहे. इतरांना वेगळा न्याय व मला वेगळा न्याय दिला जात



आहे. माझ्या प्रमाणे फडणवीसांनी उपोषण केल्यास त्यांना वजन कमी करण्यासाठी दुसरा पर्याय लागणार नाही. सलाईन लावायला शिरही सापडणार नाही. यासाठी माझ्या बाजूला उपोषणाला बसा असे म्हणत त्यांनी फडणवीसांनावर कडाडून टिका केली. राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून सभेस प्रारंभ झाला. यावेळी उपस्थित महिलांनी मनोज जरांगे पाटील यांचे औक्षण करून स्वागत केले. यावेळी सभेच्या ठिकाणी जोरदार घोषणाबाजी सुरू होती. मनोज जरांगे पाटील म्हणाले की,मुख्यमंत्री शिंदे साहेब तुम्ही मराठ्यांच्या मनातून उतरलात. जातीसाठी मी लढा देत असताना माझा करेक्ट कार्यक्रम करण्याची भाषा तुम्ही करीत आहात हा समाज समजदार आहे. योग्य वेळी तोच तुमचा करेक्ट कार्यक्रम करील अशा शब्दात जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांवर आपली तोफ डागली. तो पर्यंत पुढाऱ्यांनी आमच्या दारात येवू नये मी मतदार, सगेसोयरे अध्यादेश जो पर्यंत लागू होत नाही. तोपर्यंत पुढाऱ्यांनी आमच्या दारात येवू नये असे पोस्टर्स सभेच्या ठिकाणी प्रत्येकाच्या हातात झळकत होते. या पोस्टर्सचा संदर्भ देत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, पोस्टर्सचा अंबाजोगाई पॅर्टन संपुर्ण राज्यात दिशादर्शक ठरणारा आहे. ते आपल्याला त्यांच्या दारात येवू देत नाहीत. मग आपण तर कशाला येवू द्यायचे. जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही. तोपर्यंत हा लढा सुरूच राहिल असे त्यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )